आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२३ जून २०२४ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- नीट यूजी पेपरफुटी प्रकरणी सीबीआयकडून तक्रार दाखल
- १८ व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन उद्यापासून, २६ जून रोजी होणार सभापतीपदाची निवडणूक
- केंद्र सरकार पूरव्यवस्थापनात शून्य जीवितहानी हे उद्दिष्ट ठेवून पुढं जात असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन
- मराठा समाजाला आरक्षण नाही तर मंडल कमिशनविरोधात आंदोलन करण्याचा मनोज जरांगे यांचा इशारा
- खेळामध्ये मुला - मुलींना समान संधी देण्याचं राज्याचे क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांचं आश्वासन

**आणि**

- भारत आणि दक्षिण आफ्रिका महिला क्रिकेट संघात सुरु असलेल्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारतासमोर विजयासाठी २१६ धावांचं आव्हान

**<><><><><>**

वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या नीट-यूजी परीक्षेत अतिरिक्त गुण मिळालेल्या सर्व एक हजार ५६३ विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा आज घेण्यात आली. राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या उच्चस्तरीय समितीच्या अहवालावर सर्वोच्च न्यायालयानं नोंदवलेल्या निरीक्षणांच्या आधारे या विद्यार्थ्यांना दिलेले अतिरिक्त गुण रद्द करून फेरपरीक्षेचा निर्णय घेतल्याचं राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं म्हटलं

आहे. ज्या विद्यार्थ्यांना फेरपरीक्षा द्यायची नसेल, त्यांना अतिरिक्त गुणांविना मिळालेले गुण ग्राह्य धरले जातील, असंही संस्थेनं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

नीट यूजी पेपरफुटीप्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने केलेल्या तक्रारीनंतर सीबीआय अर्थात केंद्रीय अन्वेषण संस्थेने गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी देशभरात दाखल झालेल्या गुन्ह्यांचा तपास हाती घेण्यासाठी सीबीआय पावलं उचलत आहे. नीट यूजी परीक्षेतल्या अनियमिततेचं प्रकरण काल केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने सीबीआयकडे सोपवलं होतं. परीक्षेचं पावित्र्य अबाधित राखण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या हिताचं रक्षण करण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे. तसंच या प्रकरणात दोषी असणाऱ्यांविरोधात कडक कारवाई केली जाईल, असं शिक्षण मंत्रालयाने सांगितलं.

दरम्यान, याच प्रकरणात दहशतवादविरोधी पथक - एटीएसच्या नांदेड शाखेने दोन शिक्षकांना चौकशीसाठी ताब्यात घेतलं असून, त्यांचा या पेपरफुटी प्रकरणी काही संबंध आहे का, याचा तपास केला जात असल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशपरीक्षा राज्यपातळीवर घेण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली आहे. वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेश परीक्षा म्हणजेच नीट-पीजी पुढे ढकलल्याबद्दल त्यांनी केंद्र सरकारवर टीका केली आहे.

विविध प्रवेशपरीक्षांवरच्या आक्षेपांच्या पार्श्वभूमीवर आजची नीट-पीजी रद्द करण्याचा निर्णय घेतल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे. विद्यार्थ्यांचं हित लक्षात घेऊन हा निर्णय घेतला आहे आणि परीक्षेचं सुधारित वेळापत्रक लवकरच जाहीर होईल असं मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><

१८ व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन उद्यापासून सुरू होणार आहे. अधिवेशनादरम्यान नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी होईल. लोकसभेचे हंगामी सभापती ज्येष्ठ भाजप खासदार भर्तृहरी महताब हे नवनिर्वाचित खासदारांना शपथ देतील. लोकसभा सभापती पदासाठी येत्या २६ जून रोजी निवडणूक होणार आहे. राज्यसभेचं अधिवेशन येत्या २७ तारखेला सुरू होणार आहे. त्याच दिवशी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं अभिभाषण दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीसमोर होईल. हे अधिवेशन ३ जुलैपर्यंत चालेल.

<><><><><>

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर देशभरात आपत्ती व्यवस्थापनाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय बैठक आज नवी दिल्ली इथं झाली. पुराचं व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने दूरगामी धोरण तयार करण्यासंदर्भातही बैठकीत चर्चा झाली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकार शून्य जीवितहानी हे उद्दिष्ट ठेवून पुढं जात असल्याचं शहा यांनी सांगितलं.

इस्त्रोने दिलेल्या उपग्रह चित्रांचा आणि इतर माहितीचा अचूक वापर आणि बचावाच्या दृष्टीनं उपलब्ध साधनसामुग्रीचा सुयोग्य वापर केला पाहिजे असं शहा म्हणाले. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने वेळोवेळी जारी केलेल्या सूचनांची अंमलबजावणी वेळच्या वेळी करण्याचं आवाहन त्यांनी सर्व राज्य सरकारं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासनांना केलं. ठिकठिकाणच्या धरणांचे दरवाजे सुस्थितीत असल्याची खातरजमा करण्याचे निर्देश गृहमंत्र्यांनी केंद्रीय जल आयोगाला दिले. हवामान, पाऊस, अतिवृष्टी, पूर,विजांचा कडकडाट यासंदर्भातले इशारे दूरचित्रवाहिन्या, एफ एम रेडियो आणि एसएमएसद्वारे जनतेपर्यंत पोचवावे असं त्यांनी हवामानशास्त्र विभागाला सांगितलं. केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील आणि गृह राज्य मंत्री नित्यानंद राय तसंच विविध विभागांचे वरिष्ठ सरकारी अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

**<><><><><>**

मराठा आणि धनगर समाजात संघर्ष घडवण्याचा मंत्री छगन भुजबळ यांचा डाव असल्याचा आरोप मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये वार्ताहर परिषदेत केला. मराठा समाजाला आरक्षण मिळायला हवं. ते मिळालं नाही तर आपलं पुढचं आंदोलन मंडल कमिशनविरोधात असेल असा इशारा जरांगे यांनी दिला. तसंच राज्यातल्या मुस्लिम समाजाच्याही कुणबी नोंदी आढळल्या असून त्यांनाही ओबीसीतून आरक्षण मिळायला हवं असं जरांगे म्हणाले.

**<><><><><>**

कुणबी हा वेगळा प्रवर्ग असून त्यांच्या नोंदी रद्द करता येणार नाहीत, असं सांगत मराठा हे कुणबींपेक्षा वेगळे असल्याचं ओबीसी आंदोलनकर्ते लक्ष्मण हाके यांनी

जालन्यात झालेल्या वार्ताहर परिषदेत सांगितलं. मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षणाच्या मागणीला विरोध करत आरक्षण हा एकमेव उपाय नाही असं हाके म्हणाले. तसंच मनोज जरांगे यांनी आरक्षणावर बोलण्याआधी आरक्षणाचा अभ्यास करावा असा सल्लाही त्यांनी दिला. सरकारने ओबीसी विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या महाज्योती शिष्यवृत्तीचा निधी दिला नाही, सरकारने ओबीसी समाजाचं वाटोळं केलं असा आरोपही लक्ष्मण हाके यांनी केला.

**<><><><><>**

शेतकऱ्यांना अधिक दरानं बियाणं आणि खतं विकणं, तसंच बियाणं चोरी प्रकरणी वाशीम जिल्ह्यातल्या एकंदर ११ कृषी सेवा केंद्रांवर कारवाई करण्यात आली आहे. यापैकी आठ कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत, तर तीन कृषी सेवा केंद्रांचे परवाने रद्द करण्याचा निर्णय कृषी विभागाच्या भरारी पथकानं घेतला आहे.

**<><><><><>**

खेळामध्ये मुला-मुलींना समान संधी देण्यास प्राधान्य दिलं जाईल, अशी ग्वाही राज्येच क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी दिली. जागतिक ऑलिम्पिक दिनानिमित्त महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या वतीने आणि महाराष्ट्र क्रीडा संचालयानालयाच्या सहकार्याने पुण्यात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. जिल्हा क्रीडा संकुलांना दहा कोटी रुपये तर तालुका क्रीडा संकुलांना पाच कोटी रुपये अनुदान देण्याची घोषणा यावेळी बनसोडे यांनी केली.

महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ऑलिम्पिक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. खेळाच्या माध्यमातून समाजात एकता,

समता आणि बंधुता रुजवणं गरजेचं असल्याचं ते म्हणाले. युवा आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनीही आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

दरम्यान, ऑलिम्पिक दिनानिमित्त आज राज्यभरात कार्यक्रम साजरे करण्यात आले. यात आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सन्मान, ऑलिम्पिक दौड, हॉकीसह विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतला शेवटचा सामना आज बंगळुरूच्या चिन्नास्वामी मैदानावर होत आहे. दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ८ खेळाडूंच्या मोबदल्यात निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा दक्षिण आफ्रिकेनं २३ षटकात दोन बाद १२४ धावा केल्या होत्या.

**<><><><><>**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्रोने आज पुष्पक या अग्निबाणाचं तिसऱ्यांदा यशस्वी परीक्षण केलं. कर्नाटकच्या चित्रदुर्ग एअरोनॉटिकल टेस्ट रेंज एटीआर इथे हे परीक्षण झालं. आज सकाळी ७ वाजून १० मिनिटांनी वायू सेनेच्या चिनुक हेलिकॉप्टरमधून पुष्पकला ४ पूर्णांक ५ दशांश किलोमीटर उंचीवरून सोडण्यात आलं. प्रक्षेपणानंतर अर्ध्या तासाने हे यान युद्धसराव पूर्ण करून स्वयंचलित पद्धतीनं पुन्हा रनवेवर उतरलं.

**<><><><><>**

पवईतल्या जय भीमनगरमधल्या बेघरांच्या तात्पुरत्या निवाऱ्याची सोय सरकारने त्याच ठिकाणी करावी अशी मागणी काँग्रेसचे नसीम खान यांनी केली आहे. जूनच्या पहिल्या आठवड्यात महापालिकेचे अधिकारी आणि स्थानिक विकासकाच्या उपस्थितीत पोलिसांनी जयभीम नगरमधली घरे तोडली. हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, तरीही माणुसकीच्या दृष्टीकोनातून  या कारवाईत बेघर झालेल्यांच्या निवाऱ्याची सोय करावी अशी मागणी खान यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे केली आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र बाल हक्क संरक्षण आयोगातर्फे पालघर बाल हक्क आयोग आपल्या दारी ही संकल्पना जिल्ह्यात राबवण्यात येत आहे. याच अंतर्गत आज पालघर जिल्हाधिकारी कार्यालयात २२ प्रलंबित सुनावणी आणि आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी उपस्थित नागरिक आणि शासकीय विभागांचे प्रश्न, समस्या सोडवण्यात आल्या. तसंच काही प्रकरणात अहवाल आयोगाकडे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**<><><><><>**

**वाशिम** शहर तसंच जिल्ह्यात गेल्या तासाभरापासून मुसळधार पाऊस सुरू आहे. या पावसामुळे पेरण्या केलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

**नाशिक** जिल्ह्यात आज दिवसभर पावसानं चांगली हजेरी लावली. बऱ्याच दिवसांच्या विश्रांतीनंतर आज नाशिक शहरासह अन्य भागात झालेल्या पावसानं

नागरिकांना दिलासा मिळाला आहे. या पावसाने अनेक भागात पाणी साचलं होतं. या भागात ११ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

<><><><><>

येत्या चोवीस तासांत कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा आणि मुसळधार पावसाची शक्यता आहे. दक्षिण कोकणात तुरळक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे,

<><><><><>